15 FEB 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारसा सांभाळत उद्योगांना वेगळे स्वरूप द्या

## डॉ. संजय धांडे : विद्यापीठात नवोपक्रम, स्टार्टअप परिषदेला प्रारंभ

कोल्हापूर, ता. १४ : 'देशात उत्तम औद्योगिक पर्यावरण निर्माण होण्यासाठी शिक्षण, उद्योग आणि शासन या तिन्ही क्षेत्रांचा समन्वय झालाच पाहिजे. कोल्हापूरला उद्योजकता संस्कृतीचा मोठा वारसा लाभला आहे. हा वारसा सांभाळताना आता आपल्याला या उद्योगांची वेगळ्या प्रकारे बांधणी करावी लागणार आहे. कालसुसंगत राहण्याच्या दृष्टीनेही कोल्हापूरच्या उद्योगांचा विचार करण्याची आवश्यकता आहे', असे प्रतिपादन आयआयटी कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आजपासून 'विकसित भारत-२०४७साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' या विषयावर आयोजित 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०' या परिषदेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. धांडे म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी आणि विशेषतः अभियंत्यांनी स्टार्टअपकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अणुऊर्जा, संरक्षण या क्षेत्रांमध्ये स्टार्टअप विकास, संशोधनाच्या अनेक संधी आहेत.'



कोल्हापूर : परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. संजय धांडे. यावेळी डावीकडून डॉ. प्रकाश राऊत, व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील.

### ■ दिवसभरात तज्ज्ञ, उद्योजकांचे मार्गदर्शन

या परिषदेत दिवसभरात साऊंड कास्टिंग प्रायव्हेट लिमिटेडचे सरव्यवस्थापक आनंद देशपांडे (विषय - उत्पादन क्षेत्रातील नवप्रवाह आणि संधी), टीसीएसच्या ॲकॅडेमिक अलायन्स ग्रुपचे प्रादेशिक प्रमुख हृषिकेश धांडे (व्यावसायिक जीवनासाठीची तयारी), पुण्याच्या माने ग्रुप ऑफ कंपनीजचे चेअरमन रामदास माने (असा घडतो उद्योजक), हैदराबादच्या टी-हब कंपनीचे डॉ. राजेशकुमार अडला (उत्पादन नेतृत्व : उद्योवृद्धीचा मार्ग), हुबळीच्या देशपांडे स्कील डेव्हलपमेंट सेंटरचे नरसिंह नायक पेरमपल्ली (भावी पिढीसाठी पायाभरणी) यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
15 FEB 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# औद्योगिक पर्यावरणासाठी समन्वय आवश्यक

- डॉ. संजय धांडे यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात स्टार्टअप परिषदेस प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशात उत्तम औद्योगिक पर्यावरण निर्माण होण्यासाठी शिक्षण, उद्योग आणि शासन या तिन्ही क्षेत्रांचा समन्वय झालाच पाहिजे, असे प्रतिपादन आयआयटी, कानपूरचे माजी संचालक तथा उज्जैनच्या अवंतिका विद्यापीठाचे कुलपती 'पद्मश्री' डॉ. संजय धांडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील 'विकसित भारत–२०४७ साठी नवोपक्रम आणि स्टार्टअप्स' या दोन दिवसीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. तर, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद



कोल्हापूर : परिषदेत बोलताना डॉ. संजय धांडे.

पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र आणि एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने परिषद आयोजित केली असुन पीएम–उषा यांचे अर्थसहाय्य लाभले आहे.

डॉ. धांडे म्हणाले, आजवर शिक्षण आणि उद्योग यांच्या विषयीच्या परिषदा पाहिल्या आहेत. मात्र शिवाजी विद्यापीठात प्रथमच शासन हा घटक त्यात समाविष्ट झाला आहे. आपल्या समस्यांवर आपणच उपाय शोधले पाहिजेत. या दृष्टीने विद्यार्थ्यांनी आणि विशेषत: अभियंत्यांनी स्टार्टअपकडे गांभिर्याने पाहण्याची गरज आहे. शिक्षकांकडून स्टार्टअपविषयी केवळ मार्गदर्शन नव्हे, तर कृतीशील उदाहरणे निर्माण करावीत. बँकांनी आवश्यक ते पाठबळ पुरवावे, असे सांगितले. इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

या परिषदेत आज बारामतीच्या डॉ. संतोष करंजे यांचे 'कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कृषी', अमेरिकेतील गोरे समूहाच्या विनया गोरे यांचे 'अमेरिकी परिप्रेक्ष्यात उद्योजकता', आणंदच्या सरदार पटेल विद्यापीठाच्या डॉ. सौरभ सोनी यांचे 'ऊर्जा निर्मिती आणि साठवणूक तंत्रज्ञान' या विषयांवर व्याख्यान होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB २०२५
तरुण भारत

# 'पीएचडीवाला गुळव्या' ठरला लक्षवेधी

- शिवाजी विद्यापीठात नवसंशोधक स्टार्टअप प्रदर्शनाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात 'पीएचडीवाला गुळव्या' त्याच्या आधुनिक गुऱ्हाळयंत्रासह पाहावयास मिळाला. विद्यापीठात 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०'च्या निमित्ताने आयोजित विशेष नवसंशोधक आणि स्टार्टअप्स प्रदर्शनामध्ये हा गुळव्या लक्षवेधी ठरला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

डॉ. ओंकार अपिने आणि जैवतंत्रज्ञान अधिविभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. सुषमा पाटील यांनी अधिविभाग प्रमुख डॉ. ज्योती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुळावर आणि गूळ निर्मिती प्रक्रियेवर गेली अनेक वर्षे काम केले. यामध्ये रसवंतीगृहाप्रमाणे रसही काढता येईल आणि आरोग्यदायी पद्धतीने गूळही तयार करता येईल असे यंत्र तयार केले. गुऱ्हाळघराला किमान १२ ते १५ जणांइतके मनुष्यबळ लागते. मात्र, येथे दोघे काम करू शकतात. गुळाची ढेप, पावडर, वडी, काकवी तसेच इतर पदार्थ बनविण्याविषयीही माहिती देण्यात आली. या प्रकल्पाची, त्याच्या उत्पादनांची शेतीतज्ज्ञ प्रताप चिपळूणकर यांनीही पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रकाश वडगांवकर, डॉ. अण्णासाहेब गुरव, सुभाष माने, डॉ. पंकज पवार, डॉ. गजानन राशिनकर, डॉ. रचना इंगवले, डॉ. एस.एस. काळे, डॉ. सत्यजीत पाटील उपस्थित होते.



कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी तयार केलेले आधुनिक गुऱ्हाळयंत्र.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2025

सकाळ

# 'पीएचडीवाला गुळव्या' ठरला लक्षवेधी

कोल्हापूर, ता. १४ : कोल्हापूरकरांना गूळ, गुऱ्हाळघरे आणि तिथले गुळवे हे काही नवे नाहीत. आज मात्र शिवाजी विद्यापीठात आलेल्या अभ्यागतांना 'पीएचडीवाला गुळव्या' त्याच्या आधुनिक गुऱ्हाळ यंत्रासह पाहावयास मिळाला. विद्यापीठातील नवसंशोधक आणि स्टार्टअप्स प्रदर्शनामध्ये या गुळव्याला आणि त्याच्या उत्पादनांना आज मोठी पसंती लाभली.


स्वतःला अभिमानाने 'पीएचडीवाला गुळव्या' म्हणवून घेणारे आणि आपल्या ब्रँडचेही नाव तेच ठेवणारे डॉ. ओंकार अपिने आणि विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागातील सहायक प्राध्यापक डॉ. सुषमा पाटील यांनी अधिविभागप्रमुख डॉ. ज्योती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुळावर आणि गूळ निर्मिती प्रक्रियेवर गेली अनेक वर्षे काम केले. त्यांनी खऱ्या अर्थाने सेंद्रिय अशा गुळाची, गूळ पावडरची निर्मिती केली. या प्रकल्पाची, त्याच्या उत्पादनांची शेतीतज्ज्ञ प्रताप चिपळूणकर यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले. डॉ. गजानन राशिनकर, रचना इंगवले, एस. एस. काळे, सत्यजित पाटील यांनी प्रदर्शनाचे संयोजन केले.



कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी तयार केलेले आधुनिक गुऱ्हाळ यंत्र.

> 'या प्रकल्पांतर्गत पोर्टेबल गुऱ्हाळ यंत्राची निर्मिती केली आहे. यामध्ये रसवंतीगृहाप्रमाणे रसही काढता येईल आणि आरोग्यदायी पद्धतीने गूळही तयार करता येईल. येथे अगदी दोघा जणांतही काम करता येऊ शकते.
>
> -डॉ. ओंकार अपिने

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2025
लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आधुनिक गुऱ्हाळयंत्र तयार केले आहे.

# विद्यापीठाचा 'पीएचडीवाला गुळव्या' ठरला लक्षवेधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूरकर नागरिकांना गूळ, गुऱ्हाळघरे आणि तिथले गुळवे हे काही नवे नाहीत. शुक्रवारी मात्र शिवाजी विद्यापीठात आलेल्या अभ्यागतांना 'पीएचडीवाला गुळव्या' त्याच्या आधुनिक गुऱ्हाळयंत्रासह पाहावयास मिळाला. विद्यापीठात 'शिक्षण, उद्योग आणि शासन परिषद १.०'च्या निमित्ताने आयोजित विशेष नवसंशोधक आणि स्टार्टअप्स प्रदर्शनामध्ये या गुळव्याला आणि त्याच्या उत्पादनांना मोठीच पसंती लाभली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

स्वतःला अभिमानाने 'पीएचडीवाला गुळव्या' म्हणवून घेणारे आणि आपल्या ब्रँडचेही नाव तेच ठेवणारे डॉ. ओंकार अपिने आणि विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान अधिविभागातील सहायक प्राध्यापक डॉ. सुषमा पाटील यांनी अधिविभाग प्रमुख डॉ. ज्योती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुळावर आणि गूळ निर्मिती प्रक्रियेवर गेली अनेक वर्षे काम केले. त्याद्वारे त्यांनी खऱ्या अर्थाने सेंद्रिय अशा गुळाची, गूळ पावडरची निर्मिती केली. या अंतर्गत उसाचे रसवंतीगृह आणि गुऱ्हाळघर यांच्यात सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. यासंदर्भात डॉ. अपिने यांनी सांगितले की, या प्रकल्पाअंतर्गत पोर्टेबल गुऱ्हाळयंत्राची निर्मिती केली आहे. यामध्ये रसवंतीगृहाप्रमाणे रसही काढता येईल आणि आरोग्यदायी पद्धतीने गूळही तयार करता येईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज संख्याशास्त्र कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (दि. १५) पीएम-उषा पुरस्कृत 'वास्तविक समस्यांचे सांख्यिकीय अन्वेषण' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी ही माहिती दिली.

कार्यशाळा तीन सत्रात होणार आहे. पहिल्या सत्रामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि डॉ. शशिभूषण महाडिक यांची व्याख्याने होतील. दुसऱ्या सत्रात 'माझे संख्याशास्त्र, माझे जीवन' हे संवादात्मक चर्चासत्र असून, यामध्ये ज्यांनी सांख्यिकीशास्त्रात यशस्वी कारकीर्द घडवली आहे, अशा अधिविभागाच्या प्रतिष्ठित माजी विद्यार्थ्यांची प्रेरणादायी मुलाखत होईल. तिसऱ्या सत्रात शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघटना (सुस्टा) यांच्या संयुक्त विद्यमाने बी.एस्सी. (भाग ३) च्या सांख्यिकीशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी 'सार्वजनिक आरोग्यामधील सांख्यिकीय अंतर्दृष्टी' या विषयावर प्रकल्प सादरीकरण स्पर्धा आयोजित केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून आजअखेर ६७१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ६७१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयामध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांतर्गत शुक्रवारी एम. टेक.च्या दोन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजित सिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2025
पुढारी

# अ. भा. आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेत विवेकानंद कॉलेजचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कश्मीर गुलमर्ग येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरच्या गायत्री लोळगे, वैष्णवी पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व करत आईस स्टॉक खेळामध्ये टीम टार्गेट व टीम डिस्टन्स खेळ प्रकारात सुवर्णपदक मिळविले. स्पर्धांसाठी भारतामधून विविध विद्यापीठातून ४५ विद्यापीठांचा समावेश होता.

यशस्वी खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग व सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.


15 FEB 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभिव्यक्तीसाठी शब्दांमधील भाव समजून घ्या

## उच्चारशास्त्रतज्ज्ञ तुषार भद्रे; शिवाजी विद्यापीठात व्हॉईस कल्चर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शब्द हे अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन आहे. सक्षम अभिव्यक्तीसाठी शब्दांतील भाव ओळखता आला पाहिजेत, असे मत प्रसिद्ध उच्चारशास्त्रतज्ज्ञ तुषार भद्रे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापिठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पीएम उषा योजनेंतर्गत 'ई-कंटेंट डेव्हलपमेंट अँड ऑनलाईन पेडागॉगी' कार्यशाळेत ते बोलत होते.



कोल्हापूर : उच्चारशास्त्रतज्ज्ञ तुषार भद्रे यांचे स्वागत करताना डॉ. के. बी. पाटील. सोबत डॉ. शिवाजी जाधव, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे आदी मान्यवर.

प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. कार्यशाळेची भूमिका दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्र-संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी स्पष्ट केली. सूत्रसंचालन डॉ. सुमेधा साळुंखे यांनी केले. पाहुण्यांची ओळख जयप्रकाश पाटील यांनी करून दिली. आभार डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी मानले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, सहायक कुलसचिव ए. आर. कुंभार, अनुप जत्राटकर, डॉ. नितीन रणदिवे, नाझिया मुल्लाणी, डॉ. मुफीद जमादार, बबन पाटोळे, डॉ. संजय चोपडे, डॉ. तानाजी घागरे, उदय पाटील, डॉ. प्रकाश मुंज, मास कम्युनिकेशन आणि बी. ए. फिल्म मेकिंगचे विद्यार्थी उपस्थित होते.